# परतीची उन्हे

वाटता नभाचे रंग फिके, थांब नदी किनारी सखया
रंगवून घे स्मृती आपुली, पाठविते परतीची उन्हे तुजला ॥ १ ॥

तुला वाटले जरी एकले, एक उसासा सावध घे
सोबतीस जरी मी नसले, सावलीसम मज बिलगून घे ॥ २ ॥

जाणते तुझ्या मनी हूरहूर, सांजवेळी जे काहूर उठे
तळमळ होता जरी विखारी, चांद रातीला शिंपून घे ॥ ३ ॥

कुठे तू अन दूर किनारा, क्षितिजासम अंतर दूर भरे
स्पंदनातुनी रे तुझिया माझ्या, श्वासातून अंतर संपत ये ॥ ४ ॥

© सपु, www.saarthbodh.com

– सचिन कुलकर्णी